



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, शनिवार, दि.०७ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : २९६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

## भाजप-काँग्रेसमध्ये 'अघोषित युती', 'आप'चा मोठा दावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नवी दिल्ली :** भाजप व काँग्रेसच्या नेतृत्वामध्ये 'अघोषित युती' असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. तर विरोधकांची इंडिया आघाडी आता कालबाह्य झाल्याने दोन्ही मोठ्या पक्षांना वगळून तिसरी आघाडी स्थापन करणे गरजेचे आहे, अशी भूमिकाही 'आप'ने मांडली.



दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री व विधानसभेतील वर्तमान विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी असे सांगून लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि गांधी कुटुंबाविरुद्धच मोहीम सुरू केली आहे. आतिशी यांनी सांगितले की, काँग्रेसने भाजपसोबत अघोषित युती केली आहे, त्यामुळे नॅशनल हेराल्ड प्रकरणातील आरोपी आणि रॉबर्ट वाड्रासारखे लोक तुरुंगात जाणार नाहीत. ऑपरेशन सिंदूरनंतर संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या म ागणीवर दिल्लीत नुकतीच इंडिया मधील नेत्यांची बैठकही झाली होती, परंतु 'आप' नेते त्यात सहभागी झाले नव्हते. कारण इंडिया ब्लॉकची प्रासंगिकता काय, असे प्रश्नचिन्हही आतिशी यांनी उपस्थित केले.

केंद्र सरकार उर्वरित देशातील अनेक विरोधी नेत्यांना त्रास देत आहे, परंतु काँग्रेसच्या क्र. १ च्या घराण्यातील सर्वोच्च नेत्यांना तुरुंगात पाठवले जात नाही, असा आरोप करताना आतिशी म्हणाल्या की, काँग्रेसने इंडिया आघाडीचे नेतृत्व करायला हवे होते. कारण तो सर्वांत मोठा विरोधी पक्ष आहे आणि सर्व राज्यांमध्ये त्यांचे अस्तित्व आहे. पण हा पॅटर्न तुम्हाला काय सांगतो? आम आदमी पक्षाचे वरिष्ठ नेते तुरुंगात कसे जातात, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, सीपीएमचे पिनारायी विजयन यांच्या मुलीविरुद्ध गुन्हे दाखल करत आहात. दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि संजय सिंह तुरुंगात गेले आहेत. पण नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेसच्या बाबतीत असे का घडत नाही? त्यांचे नेते तुरुंगात का जात नाहीत? यात राहुल गांधी आणि त्यांची आई सोनिया गांधी या प्रकरणात मुख्य आरोपी आहेत आणि जामिनावर बाहेरच आहेत.

भाजप व काँग्रेस यांच्यातील अघोषित युतीमुळे हे घडत आहे, असा मोठा दावा आतिशींनी केला आहे. तिसऱ्या आघाडीबद्दल आतिशी म्हणाल्या की, देशातील बिगर-काँग्रेसी आणि बिगर-भाजपा पक्षांनी देशात घडणाऱ्या घटनांचा निश्चितच विचार केला पाहिजे. त्यांनी राज्यांच्या हक्कांचा आणि नेत्यांच्या छळाचा विचार केला पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत तिसरी आघाडी हा एक चांगला पर्याय असू शकतो. कारण काँग्रेस नेते भाजपची भाषा बोलत आहेत, असाही आरोप आतिशी यांनी केला.

## वाळकीचे आरोग्य केंद्र, आठवडे बाजार सुरळीत ! खा. लंके यांच्या मदत मोहीमेचा इम्पॅक्ट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** गेल्या आठवड्यात नगर तालुक्यातील काही गावांमध्ये अतिवृष्टी होऊन झालेल्या नुकसानीनंतर रविवारी खा. नीलेश लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या-त्या गावांमध्ये जात केलेल्या मदत कार्यामुळे तेथील जनजीवन सुरळीत झाले आहे. गाळाने माखलेले प्राथमिक आरोग्य केंद्र चकाचक करण्यात आल्याने ते सोमवारी सुरळीत सुरू झाले, आठवडे बाजार भरला तर जुंदरे मळ्यातील रस्ताही सुरू झाला.



सारोळा कासार येथील वाहून गेलेला स्मशानभुमीचा भाग भराव टाकून पुर्ववत करण्यात आला. काळे मळयाचा रस्ता दोन पुल दुरूस्त करून सुरळीत करण्यात आला. बारवे मळ्यातील दत्त मंदिराकडे जाणारा रस्ता तसेच अकोळनेर ते सारोळा शिवरस्ता खा. लंके यांच्या मावळ्यांनी दुरूस्त केला.

भोरवाडीच्या वाळुंबा नदीवरील पडलेला पुल दुरूस्त करण्यात आल्याने खडकवाडी येथील शेतक-यांचे दळणवळण सुरळीत झाले. दुग्ध व्यवसायिकांना डोक्यावर किटली घेऊन दूध संकलन केंद्राकडे जावे लागत होते त्या रस्त्यावरील पुलाचे व खैरेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम करण्यात आल्याने दूध संकलनही सुरळीत झाले. पुल वाहून गेल्याने दळवी वस्तीचा संपर्क तुटला होता, पुलाची दुरूस्ती झाल्याने दळवी वस्तीचेही दळणवळण पुर्ववत झाले. अकोळनेर येथील तरोडी मळा, मेहेत्रे वस्ती, थोरात वस्ती, देशमुख मळ्याचा संपर्क तुटला होता. त्या त्या भागातील पूल व रस्त्यांची दुरूस्ती करण्यात आल्याने ग्रामस्थांचे जाणे येणे सुरळीत झाली. खडकी येथील जाधववाडी व अकोळनेर हा रस्ता पुल वाहून गेल्याने बंद झाला होता. हा पूलही दुरूस्त झाल्याने रखडलेली वाहतूक पुर्ववत झाली. खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली वाळकी येथिल आरोग्य केंद्रात मदत कार्य राबविण्यात आल्याने तेथील आरोग्यसेवा सुरळीत झाली.

### खासदार लंकेंमुळे आरोग्यसेवा सुरळीत...

खासदार नीलेश लंके यांनी स्वतः मदत कार्यात झोकून देत आरोग्य केंद्रात साचलेला गाळ स्वतः भरला. अग्निशमन दलाचे वाहन पाचारण करून संपूर्ण आरोग्य केंद्र स्वच्छ करण्यात आले. खासदार लंके व त्यांच्या मावळा सहकाऱ्यांनी अपार कष्ट घेऊन स्वच्छता मोहीम राबविल्याने सोमवारपासून रुग्णसेवा सुरळीत झाली.

### आपत्ती काळातील लोकप्रतिनिधीचे आदर्श उदाहरण !

खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेली ही मदत मोहीम केवळ तातडीची मदत नव्हते तर पुनर्बांधणीचा एक ठोस प्रयत्न होता. शासनाच्या मदतीची वाट न पाहता स्थानिक पातळीवर राबविण्यात आलेली ही व्यापक मोहीम आपत्ती काळात लोकप्रतिनिधीने कसे पुढे यावे याचे आदर्श उदाहरण ठरेल आहे. निलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा संघटनेचे मावळे यांनी खासदार निलेश लंके यांच्या आवाहनास प्रतिसाद देत निष्ठेने राबविलेले मदत कार्य आपत्ती ग्रस्तांनांच्या कायम स्मरणात राहील.

## आषाढी वारी कालावधीत वारकरी भाविकांचे सुविधेसाठी निधीची कमतरता नाही

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** आषाढी यात्रेसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी भावीक चालत येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग, तळ या ठिकाणी सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. तसेच या काळात पालखी सोहळ्या व्यतिरिक्त लाखो भाविक पंढरपुरात येतात, अशा सर्व भाविकांच्या राहण्याची व्यवस्था पंढरपूर शहरात करण्यात यावी यासाठी प्रशासनाने तयारी करावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी सोहळा २०२५ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद , मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त तुषार ठोंबरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे व्यवस्थापक म नोज श्रोती, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, तसेच अन्य विभागाचे प्रमुख उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना उत्कृष्ट सोयी सुविधा देण्यासाठी शासन कटीबद्ध आहे. तसेच ही आषाढी वारी स्वच्छतेची वारी होण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे. यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्र कायम स्वच्छ राहील यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात येणार आहे.

तसेच वारीपूर्वी पंढरपूर शहरात लोकसहभागातून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. वारकरी भाविकांना उपलब्ध सुविधा तसेच सूचनांची माहिती देण्याचे फलक किमान १५ फूट उंचीचे लावावेत. नदीपात्रातील होड्यांची नोंद घेऊन होडी मालक व चालक यांचे नाव, आसन क्षमता निश्चित करून होडीत जास्त लोक बसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच होडीमध्ये मुबलक प्रमाणात लाईफ जॅकेटची व्यवस्था ठेवली पाहिजे, असेही निर्देश त्यांनी दिले. तसेच शहरातील पार्किंगच्या ठिकाणी मुरमीकरण व रोलिंग करावे. पालखी मार्ग, तळ तसेच पंढरपूर शहरातील अतिक्रमणे काढण्यासाठी पोलीस नगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वय साधून संयुक्तपणे कार्यवाही करावी. वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पालखी मार्ग तसेच शहरातील रस्त्यावर बंद पडलेली वाहने तात्काळ काढण्याची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करावी, अशाही सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीची सविस्तर माहिती दिली. तसेच या वारी कालावधीत मानाच्या पालख्यासह अन्य पालख्या, दिंड्या, वारकरी व भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही यासाठी प्रशासन काटेकोरपणे नियोजन करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

## थोडक्यात

### अहिल्यानगर जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी... प्रशासनातर्फे दक्षतेचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** जिल्ह्यात ४ ते ७ जून २०२५ दरम्यान वीजांच्या कडकडाटासह वादळी वारा व मुसळधार पाऊस होण्याचा शक्यता भारतीय हवामान खात्यामार्फत वर्तवण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी यलो अलर्टही जारी करण्यात आला असुन नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नदीकाठावरील गावांनी स्थानिक प्रशासनाद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदी क्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. नदी, ओढे व नाल्याच्याकाठच्या नागरिकांनी दक्ष राहावे. पाणी पातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदि पात्रापासून तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे. सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे नाल्यांवरील पुलावरून पाणी वाहत असल्यास व धोकादायक इमारतींमध्ये आश्रय घेऊ नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने शक्यतो प्रवास करणे टाळावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे पोलिस स्टेशन किंवा तहसील कार्यालयात, जिल्हाधिकारी कार्यालयात अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४ अथवा २४६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### बुलढाणा जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसण्याची शक्यता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यात काँग्रेसला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. खामगावचे माजी आमदार दिलीपकुमार सानंदा हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. पक्षातील अंतर्गत कलहामुळे ते नाराज होते. त्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे. सानंदा यांच्या जाण्याने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासमोर जिल्ह्यात पक्ष टिकवण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

दिलीपकुमार सानंदा हे खामगाव मतदारसंघातून तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. त्यांनी काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न केले. पण, आता ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. अजित पवार यांच्या उपस्थितीत १२ जून रोजी खामगावात त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. ५ मे रोजी यासाठी तयारी बैठक होणार आहे. याआधी विजय अंभोरे यांनीही काँग्रेस सोडली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. राहुल गांधी यांच्या टीममध्येही त्यांनी काम केले आहे. सध्या त्यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी आहे. राज्यात काँग्रेसला मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. पण, त्यांच्याच जिल्ह्यात पक्षाला खिंडार पडले आहे. पक्षांतर्गत कलहाला तोंड देतानाच सानंदा खचले. 'जब तक जिंदा हूँ, काँग्रेस का परिंदा हूँ' असे छातीठोक म्हणणारे सानंदा यांची काँग्रेसमध्ये होणारी अडचण पक्षाबाहेर निघण्यास भाग पाडत आहे. आपल्या हातावर दिलीप सानंदा यांनी घड्याळ बांधण्याचा निश्चय पक्का केल्याची विश्वसनीय माहिती आहे. अजित पवार यांच्या उपस्थितीत खामगाव येथेच 'डंके की चोट पे' हा प्रवेश सोहळा होणार आहे. अद्याप पवार यांचा दौरा निश्चित झाला नाही. पण, १२ जून ही तारीख राष्ट्रवादी काँग्रेसच्या बळकटीसाठी ठरवली आहे, असे समजते.

# संपादकीय

## जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का ? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का ? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का ? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समरंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का ? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का ? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का ? या समरंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का ? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण ? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी.

**या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# त्याग आणि बलीदानाचा सण : ईद अल-अज़हा

**- प्रविण बागडे -**
**नागपूर**
**मो. ९९२३६२०११९**

ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला. इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो. त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुर्बानीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात. या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या




दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कार्याची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता. असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे. वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. पण मक्का त्याकाळी वाळवंट होता,त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते. हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेत: पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते.

या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो. यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही. नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते.

इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते. नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून. बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुर्बानी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो. एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते.

**आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल-अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# जिवावर बेतणारे क्रिकेट 'वेड'

यंदाचा आयपीएल चषक रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जिंकला तब्बल अठरा वर्षांची आरसीबी ची प्रतिक्षा संपली याचा आनंदोत्सव साजरा होत असतांनाच कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन ने टीमचा सन्मान करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते मात्र या आनंदोत्सवाला गालबोट लागले आणि झालेल्या चेंगराचेंगरीत अकरा जणांचा मृत्यू तर अनेक जण जखमी झाले. वास्तविक इतक्या अल्पावधीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन करु नये असे पोलीस प्रशासनाने सांगितले होते मात्र कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन ने आणि सरकारने अट्टाहासाने कार्यक्रम केला आणि दुर्घटना घडली. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे विधानसभा आणि स्टेडियम अशा दोन ठिकाणी आयोजन करण्यात आले होते याची काहीच आवश्यकता नव्हती.वास्तविक चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता लक्षात घेऊन गर्दीचे नियोजन होणे गरजेचे होते, शिवाय फुकट प्रवेश मिळतो म्हणून लाखोंनी क्रिकेट प्रेमी आले आणि गर्दीचे नियोजन डळमळले. त्यातुन पोलिसांनी लाठीमार सुरू केला त्यामुळे पळापळ झाली आणि गर्दी बेकाबु झाली. वास्तविक आयपीएल स्पर्धेत सहभागी होणारे संघ हे खाजगी संघ आहेत या स्पर्धेत खेळणारे देशी परदेशी खेळाडू लाखो करोडो रुपये घेऊन खेळतात,क्रिकेट हा पैशाचा खेळ बनला आहे.कसोटी क्रिकेट पासुन सुरु झालेले क्रिकेट काळानुसार बदलत गेले पाच दिवसिय कसोटी नंतर पन्नास षटकांचा एक दिवसिय सामना आणि आता आयपीएल च्या माध्यमातून विस - विस षटकांचा झटपट निकाल देणारा सामना. आयपीएल ला पैसा, प्रसिद्धीचे खरे ग्लॅमर दिले ते ललित मोदी गेल्या अनेक वर्षापासून परदेशात आहेत. आयपीएल मधे खेळणाऱ्या टीमचे मालक, हे अभिनेते

, ऊद्योगपती. खेळाडू संघ निवडण्यासाठी करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल होते, जाहिरातींवर करोडो रुपये खर्च केले जातात, सगळा केवळ पैशाचा खेळ.सर्वच श्रेत्रात राजकारण्यांचा शिरकाव असतो तो क्रिकेट आणि अन्य खेळांत देखील आहे आणि जिथे राजकारणी तिथे राजकारण होणारच.खेळाडूंना क्रिकेट प्रेमी देव मानतात, आपल्या आवडत्या खेळाडूची एक झलक पाहायला मिळावी म्हणून गर्दी करतात हे सगळे ठीक आहे मात्र अशावेळी जिवावर देखील बेतते याचे भान राखले गेले पाहिजे.या पुर्वी देखील क्रिकेट पटुंच्या सन्मानार्थ अनेक सोहळे झाले होते व्यवस्थित पार पडले होते. भारताने विश्वचषक जिंकला तेव्हा मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सोहळा व्यवस्थित पार पडला होता, गर्दीचे नियोजन, व्यवस्थापन होते.

धार्मिक स्थळे, यात्रा, जत्रा, रेल्वे स्थानक परिसरात अनेकदा गर्दी होते आणि योग्य नियोजन न झाल्यास दुर्घटना घडते. एखादी दुर्घटना घडली की नेहमी प्रमाणे आरोप प्रत्यारोप, चौकश्यांचा फार्स, पिडीतांच्या कुटुंबियांना, जखमींना आर्थिक मदत, दोषींना शिक्षा होणारच, कायद्यासमोर सर्व समान, असे नेहमीच सांगितले जाते आणि केवळ वेळकाढूपणा केला जातो आणि पुढे काही होत नाही, परत एखादी दुर्घटना घडते आणि सामान्यांचा जीव जातो. काही वर्षांपूर्वी मांढरदेवी यात्रेत अशीच मोठी दुर्घटना घडली होती. तब्बल ३४० जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता तर २००३ साली नाशिक कुंभमेळ्यात धावपळीत अनेकांनी जीव गमवाला होता या राज्यातील दोन घटना लवकर विस्मरणात जाणाऱ्या नाहीत.तर दोन वर्षांपुर्वी नवी मुंबई येथे एका सद्गुरूंच्या सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमाच्या वेळी देखील दुर्घटना घडली होती.केरळ मधील शबरीमाला येथे देखील काही वर्षांपूर्वी अशीच दुर्दैवी घटना घडली होती. मुस्लिमांचे पवित्र स्थान मक्केत देखील भाविकांच्या अलोट गर्दीमुळे चेंगराचेंगरीत अनेकांचे दुर्दैवी मृत्यू झाले होते.अशा ठिकाणी गर्दीच्या नियोजनाचे शासन-प्रशासनाकडुन अनेकदा दावे केले जातात मात्र तरीही दुर्घटना घडत आहेत.यात्रांच्या काळात किंवा गर्दीच्या वेळी व्हिआयपी दर्शन एक मोठी समस्या ठरते आणि यामुळेच अनेकदा वादविवाद देखील होतात. हाथरस मधे एका बाबाच्या दरबारात अशीच चेंगराचेंगरी झाली होती शंभराच्या वर निष्पापांचे जीव गेले होते मात्र त्या बाबा विरोधात साधी एफ आय आर देखील झाली नाही. प्रयागराज येथे कुंभमेळाव्यात दुर्घटना घडली आणि तीस जणांचा जीव गेला होता, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जणांचा मृत्यू झाला होता पुढे काहीच झाले नाही. ना कोणाला शिक्षा ना कोणी दोषी ठरले.एवढी मोठी दुर्घटना घडली मात्र घटनेचे गांभीर्य लक्षात न घेता चमकोगिरी झाली, कार्यक्रम पार पडला, राजकारण, तु-तु-मै-मै आरोप प्रत्यारोप सुरू झाले. नाही म्हणायला विराट कोहली याने खेद व्यक्त केला. कर्नाटक सरकारने आर्थिक मदत जाहीर केली.क्रिकेट प्रेमींनीच जिवावर बेतणाऱ्या क्रिकेट वेडाला आवर घालायला हवा.क्रिकेट खेळाच्या नसत्या वेडापायी आयुष्याचा 'खेळ' होऊ नये.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## ॲरेस्ट...

डिजिटलॲरेस्टकरू
फोन येताचं विचीत्र
पाया ठिसाळ होतो
बदलून टाकले चित्र

भले भले हादरतात
शहारले रे गात्र गात्र
संतुलनसांभाळे धीरे
खरोखर प्रशंसा पात्र

बळी पडती भितीला
असूनि स्वच्छ चरित्र
नको त्या चुका करी
जरीकार्य असे पवित्र

मनावर राक्षसीपगडा
घटना घडतात सर्वत्र
सायबरगुन्हेगार वाढे
थांबताथांबेना हे सत्र

सल्ला देतात पोलिस
घाबरू नका चिन्मात्र
मिथ्या या फसवणूकी
सत्यता न किंचिन्मात्र

प्रमादनसे एकट्याचा
मुळी ना देई दोष पत्र
प्रबोधन कायदा धाक
प्रयास साधावे एकत्र

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# वाचक पत्र




## अन्यथा वारकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल !

आषाढी पालखी सोहळा १५ दिवसांवर आला असताना महापालिका विकास आराखड्यात मोशी आणि डूडूळगाव सीमेवर आळंदी पासून तीन किलोमीटर अंतरावर कत्तलखाना आरक्षित करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. पालखी सोहळ्यानिमित्त लाखो वारकरी आळंदी आणि देहू या ठिकाणी पालखीत सहभागी होण्यासाठी येतात. या पालखीमार्गातच पशुवधगृह उभारण्यास परवानगी मिळाल्याने समस्त वारकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारकरी संप्रदाय हा संपूर्ण भारतातील सर्वांत मोठा संप्रदाय आहे. आषाढीची पंढरपूर वारी हा वारकऱ्यांचा सर्वांत मोठा उत्सव. या उत्सवानिमित्त महाराष्ट्रासह देशभरातून वारकरी मंडळी ऊन,वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. हजारो किलोमीटरचा प्रवास पायी करण्याचे बळ विठूमाऊलीच त्यांना देत असते. गळ्यात तुळशीची माळ घालून भक्तिमार्गाची कास धरणारा हा वारकरी धारण केलेल्या माळेचे पावित्र्य राखण्यासाठी मांसाहार, मद्यपान त्यागतो. माउली प्रत्येक क्षणी आपल्याकडे पाहात आहे या भावाने आचारधर्माचे पालन करतो. 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' हा अभंग सर्वांनाच ठाऊक आहे. वारकरी संप्रदायांचा पाया रचणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांची समाधी आळंदी या गावी आहे, त्यामुळे वारकऱ्यांसाठी ही भूमी काशीहून उणे नाही. अशा ऐतिहासिक भूमीचे पावित्र्य राखणे हे सरकारचे कर्तव्य आहे; मात्र या कर्तव्याचा विसर पडलेल्या सरकारने आता या पवित्र भूमीच्या परिसरातच पशुवधगृह उभारण्याचा घाट घातला आहे. ज्यामुळे लाखो वारकऱ्यांसह समस्त हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. जनभावनेचा विचार करून सरकारने आळंदी क्षेत्रात पशुवधगृह उभारण्यास केलेल्या भूमीचे आरक्षण रहित न केल्यास येत्या आषाढी वारीत सरकारला वारकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागेल हे निश्चित आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींच्या शासकीय निवासी शाळेत जागतिक पर्यावरण दिन साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, हिंगणगाव (अमरावती) :** गुरुवार दिनाक ०५ रोजी सामाजिक न्याय विभाग अंतर्गत वृक्षारोपण पंधरवडा उपक्रम, या अनुषंगाने अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा हिंगणगाव ता.धामणगाव रेल्वे येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सामाजिक न्याय विभाग अंतर्गत सरोज आवारे व निवासी शाळा येथील मुख्याध्यापक अतुल बोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थित मुख्याध्यापक बोरे, सरोज आवारे,व कर्मचारी वर्ग, यांच्यातर्फे ता.धामणगाव येथे वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करून, वृक्षारोपण पंधरवडा उपक्रम राबविणार आहेत.

## माणूसकी फॉउंडेशन तर्फे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, नालासोपारा :** दिनांक ५ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नालासोपारा येथे बुद्ध स्तूप परिसरात माणूसकी फॉउंडेशन तर्फे २० झाडे लावण्यात आले कार्यक्रमास माणूसकी फॉउंडेशन चे कार्यकर्ते उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला वजागतिक पर्यावरण दिनानिमित्त माणूसकी फाऊंडेशन च्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.त्यानिमित्त झाडे लावा पर्यावरण वाचवा तसेच झाडे लावा झाडे जगवा जीवन वाचवा हा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास माणूसकी फाऊंडेशन चे अध्यक्ष घनश्याम आंबोकर सचिव राजेश जाधव, मैत्री संस्थेचे अध्यक्ष सूरज भोईर, ओ.बी.सी.एकीकरण समितिचे अध्यक्ष संतोष आंबेकर, महिला कार्याध्यक्ष रजनीताई गडा, महिला सचिव ज्योती तांबे , सदस्य विजय काकडे, प्रकाश गडा, साई रामपूरकर, राजेश मोरे, सुभाष जाधव यांनी झाडे लावून आजचा कार्यक्रम यशस्वी केला. मैत्री चे अध्यक्ष सुरज भोईर ह्यांनी निसर्ग गीत गायले व पर्यावरण विषयी आपले मत मांडले. सचिव राजेश जाधव व अध्यक्ष घनश्याम आंबोकर ह्यांनी सर्वांचे आभार मानले व पर्यावरण विषयी जागृत रहा असे अहवान केले.

## नवी मुंबई आरटीओ कार्यालयात शिवराज्याभिषेक सोहळा साजरा



**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.०६, नेरूळ (नवी मुंबई) :** नवी मुंबई येथील आरटीओ कार्यालय या ठिकाणी परिवहन प्रतिनिधी संघटना व परिवहन कार्यालय यांच्या वतीने, छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा, मोठ्या उत्साहाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन व पुष्पहार अर्पण करुन ३५२ वा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात आला.

या प्रसंगी परिवहन कार्यालय व प्रतिनिधी यांनी खास करून दैनिक अक्षराजला निमंत्रित केले, प्रतिनिधी संघटना अध्यक्ष, राजेश भोईर, धनंजय पाटील, निलेश कचरे, तसेच परिवहन अधिकारी, प्रतिनिधी, नवी मुंबईतील नागरिक या सोहळ्या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रांधे येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान येथे दर गुरुवारी भक्तांची मांदियाळी



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांधे येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान येथे प्रत्येक गुरुवारी स्वामी भक्तां ची मोठी मांदियाळी जमते, त्यानिमित्ताने प्रत्येक गुरुवारी रांधे येथे भक्तांसाठी एक भक्तिमय सोहळा च ठरतो, असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ देवस्थान चे संस्थापक अध्यक्ष अनिल राव आवारी यांनी केले आहे . प्रत्येक गुरुवारी सकाळपासूनच वातावरणात एक खास पवित्रता जाणवत असते. संध्याकाळी सूर्य मावळतीकडे झुकू लागतो आणि जस जशी आरतीची वेळ समीप येते तसतसी स्वामींच्या मंदिराभोवती भक्तांचा ओघ वाढू लागतो. आरतीला सुरूवात झाली की, मंदिरात घंटांचा व शंखाचा ध्वनी आणि उंच स्वरात श्री स्वामी समर्थ महाराजांचा गजर घुमू लागतो. स्वामींच्या तेजोमय व प्रसन्न मूर्ती ला हजारो डोळ्यांमध्ये साठवून नतमस्तक होतात. दीप आरतीचा तेजस्वी प्रकाश, उंचावलेल्या आरतीच्या थाळ्या, धूपाचा मंद दरवळ आणि मंत्रोच्चारांनी मंदिरातील वातावरण भक्तिभावाने भारून जाते. कणाकणात स्वामींचा स्पंदन अनुभवायला येत होते. जणू ही फक्त आरती नसते , महाआरती केवळ एक विधी नसतो, ती असते श्रद्धेची उत्कट अभिव्यक्ती. या महाआरतीनंतरचा महाप्रसाद हा सोहळ्याचा आणखी एक भक्तिपूर्ण टप्पा होतो . पानात वाढलेला भक्तीयुक्त महाप्रसाद हे सर्व प्रेमाने पण पोटभर वाटले जाते. मोठ्यांपासून लहानांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि प्रसन्नता झळकत असते.

# दिव्यातील मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळून देण्यासाठी प्रयत्नशिल : रमाकांत मढवी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात अनधिकृत शाळांचा विषय चांगलाच चर्चेला आला असून काही मान्यता प्राप्त शाळा आणि काही राजकीय पक्षांनी अनधिकृत शाळा बंद कराव्यात यासाठी कंबर कसली आहे. नुकतेच एका राजकीय पक्षाने न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होत आसल्यामुळे दिवा शहरातील अशा सर्व शाळा तात्काळ बंद करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी म्हणून शिक्षण अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. अशातच काल खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार दिवा शिवसेना शहरप्रमुख तथा माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली तीस पेक्षा जास्त शाळांच्या संचालकांनी पालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली. यावेळी दिवा शहरातील २५ हजार शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होऊ देणार नाही व मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी जाहीर केले आहे.

दिवा शहरात अनधिकृत इमारतींचा विषय गाजत असताना आता मात्र अनधिकृत शाळांचा विषय चव्हाट्यावर आला आहे. ठाणे महानगरपालिकेने पालिका क्षेत्रातील सर्व अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे यामध्ये दिव्यासाहीत ठाणे महानगर पालिका क्षेत्रातील ८२ शाळांचा या यादीमध्ये समावेश आहे. एकट्या दिवा शहरातील अनाधिकृत शाळांमध्ये २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि १२०० शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करत आहेत. मागील दोन वर्षापासून नवीन शाळांच्या मान्यतेची ऑनलाईन प्रक्रिया बंद असल्यामुळे तसेच दिवा शहरात ओसी आणि सीसी घेताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी यामुळे मान्यता प्राप्त करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. दिवा शहराची भौगोलिक परिस्थिती बघता व सी.आर.झेड च्या जाचक अटींचा विचार करता येथे अधिकृत शाळा बांधणं हे तांत्रिक दृष्ट्या तरी शक्य नाही. अशातच दिवा शहरात राहण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना परवडतील



अशा शाळा दिवा शहरात मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. अशा शाळांना मान्यता नसल्यामुळे या शाळा बंद कराव्यात अशी मागणी दिवा शहरातीलच काही मान्यता प्राप्त शाळासंचालकांनी व राजकीय पक्षांनी केली असल्यामुळे दिवा शहरातील २५ हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं भवितव्य टांगणीला लागले आहे. यामुळे सर्व पालक वर्गामध्ये चिंतेचं वातावरण तयार झालं असून आपल्या पाल्याचं शैक्षणिक नुकसान होणार तर नाही ना ? या चिंतेने पालक शाळांमध्ये खेटा मारत आहेत. याशिवाय दिव्यातील मान्यता प्राप्त शाळांमधील फी परवडत नसल्यामुळे व घरापासून जवळचे अंतर यामुळे पालकांना आपल्या पाल्यांचे शिक्षण अशा शाळांमध्ये करण्याशिवाय कोणताही पर्याय उपलब्ध नसल्यामुळे मुलांना शिकवायचे कसे ? या विचारात सर्व पालक वर्ग आहेत.

खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार काल ३० पेक्षा जास्त शाळांच्या संचालकांनी शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेतली, सदर भेटीत सर्व अनाधिकृत शाळांनी मान्यता मिळवण्यासाठी सकारात्मक आश्वासन पालिका आयुक्तांनी दिले असून कठीण काळात शिवसेना कायम दिवावासियांच्या सोबत राहिली असून या विद्यार्थ्यांचं शैक्षणिक भविष्य खराब होऊ देणार नाही व मान्यता नसलेल्या शाळांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना प्रयत्न शिल असेल असे मढवी यांनी स्पष्ट केले आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची देखील भेट घेणार असल्याचे रमाकांत मढवी यांनी सांगितले आहे.

# कृष्णेच्या पुराचे पाणी येणार मराठवाड्यात ; देवेंद्र फडणवीसांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

## १०० किलोमीटर बोगदा प्रस्तावित...

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०६, धाराशिव :** पावसाळ्यात समुद्रात वाहून जाणारे कृष्णेचे ४० टीएमसी पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यात आणण्यासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प आखण्यात येत आहे. दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रातून वाहून जाणारे हे पाणी १०० किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव आहे. आणि त्यानंतर हे ४० टीएमसी पाणी बीड, धाराशिव, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागांमध्ये वितरित केले जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य देऊ केले असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरस्थितींवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी आणि मराठवाड्यातील दुष्काळी भागांना जलसंपत्ती उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या उपक्रमाअंतर्गत, कृष्णा खोऱ्यातील पूरस्थितीतून दरवर्षी वाहून जाणारे अंदाजे ४० टीएमसी पाणी १०० किलोमीटर लांबीच्या बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या साहाय्याने उजनी धरणात वळविण्याचा प्रस्ताव आहे. २०१९ साली कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये आलेल्या भीषण पुरानंतर, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला होता. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश म्हणजे पुराचे पाणी समुद्रात न जाऊ देता, त्याचा उपयोग दुष्काळग्रस्त भागांच्या सिंचनासाठी करणे आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी मित्र संस्थेच्या 'कृष्णा पुरनियंत्रण प्रकल्प' अंतर्गत करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यासाठी राज्य शासनाकडून ९६३ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या टप्प्यात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, आणि जलवाहिनी प्रणाली सुधारण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. तर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, पुराचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये वळविण्याची योजना आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या



### मराठवाड्याला ४० टीएमसी पाणी मिळणार

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या मुळे होणाऱ्या या प्रकल्पामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील पुरस्थितींवर नियंत्रण करता येणार असून शेत जमिनीचे, पिकांचे व जीविताचे होणारे नुकसान टाळण्यास मदत होणार आहे तर दुसरीकडे बीड, धाराशिव या दुष्काळग्रस्त भागांना ४० टीएमसी पाणी उपलब्ध होऊन लाखो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन शेती उत्पादनात वाढ.स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवून आर्थिक विकासाला चालना मिळणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

अध्यक्षतेखाली 'कृष्णा पूर नियंत्रण प्रकल्प' बाबत महत्वाची बैठक पुणे येथील महाराष्ट्र कृष्णखोरे विकास महामंडळ कार्यालयात सोमवार २ जून रोजी पार पडली. बैठकीत सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये वारंवार उद्भवणाऱ्या पुरपरिस्थितीवर शाश्वत उपाययोजना करण्यासाठी हे अधिकचे पाणी मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी भागाला देण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. जागतिक बँकेचे तांत्रिक सल्लागार या प्रकल्पाचा 'प्रकल्प व्यवहार्यता अहवाल' पुढी तीन महिन्याच्या आत सादर करणार असल्याचेहे आमदार पाटील यांनी म्हटले आहेयावेळी कृष्णा खोरे महामंडळचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, सचिव वी एम कुलकर्णी, मुख्य अभियंता गुणाले, मुख्य अभियंता धुमाळ, उपसचिव सविता बोधेकर, अधीक्षक अभियंता शिल्पा जाधव (पाणी तंटा लवाद पुणे) अधीक्षक अभियंता कोल्हापूर अभिजीत मेत्रे, कृष्णा मराठवाडा प्रकल्प अधीक्षक अभियंता थोरात, कार्यकारी अभियंता नाईक उपस्थित होते.

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे रोप्य महोत्सवी सोहळा ; सदभक्ताकडून १००१ पोते साखर

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०५, कळंब :** सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ रोप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यासाठी कळंब येथील माऊली भक्तांच्या वतीने १००१ साखर पाठविण्यात येत आहे कळंब येथील माऊली भक्त डॉ.लक्ष्मणराव जाधवर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनात कळंब येथील सदभक्तानां याविषयी आवाहन करण्यात आले होते याला चांगला प्रतिसाद मिळाला आज दिनांक ५ जून गुरुवार रोजी जाधवर हॉस्पिटल समोर ४०० पोते साखर असलेल्या ट्रक चे पूजन करण्यात आले नारळाच्या फांद्यानी व पुष्पहारानी सजविण्यात आलेल्या ट्रकला डॉ. लक्ष्मणराव जाधवर, कळंब तहसीलचे तहसीलदार हेमंत ढोकले व उपस्थित माऊली भक्तांच्या हस्ते नारळ फोडण्यात आले.

यानंतर ही ट्रक चाकरवाडीकडे रवाना करण्यात आली. याप्रसंगी संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व डॉ. लक्ष्मणराव जाधवर यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा फेटा, शाल व बुके घेऊन सत्कार करण्यात आला



गेली २५ वर्ष कळंब येथे माऊली भक्त प्रतिवर्षी १०१ क्विंटल साखर सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताहासाठी पाठविण्यात येते यावर्षी रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याने या भव्य व दिव्य कार्यक्रमासाठी १००१ पोते साखर पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला यानुसार तीन टप्प्यात ही साखर पाठविण्यात आली यात पहिला टप्पा ३०० पोते दुसरा टप्पा

३०० पोते व दिनांक ५ जून रोजी ४०१ पोते साखर पाठविण्यात आली याप्रसंगी युवराज मुरकुटे, राजाभाऊ ओझा, अशोकराव बोराडे, सुरेश टेकाळे, लक्ष्मण कोल्हे, विजय गुंजाळ, डॉ. अभिजीत जाधवर , डॉ.अविनाश जाधवर, विशाल जाधवर , नाना जाधवर, प्रा. व्ही.एस. जाधवर ,राजेंद्र बिक्कड, प्रा. दिलीप पाटील, शरद जाधवर,अजय देशमुख, पांडुरंग गुरव, शाम नरवडे , ज्ञानेश्वर पतंगे, रमेश आंबीरकर, माधवसिंग राजपूत, बालाजी सुरवसे यांच्यासह माऊली भक्तांची उपस्थिती होती. सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण पारायण व श्री शिव महापुराण कथा ज्ञान यज्ञ सोहळा आंतरराष्ट्रीय शिव कथा प्रवक्ते परमपूज्य पंडित प्रदीप मिश्राजी (शिहोर)शिव पुराणकथा आरंभ ८ जून २०२५ कथा सांगता १४ जून २०२५ कथेची वेळ दुपारी १ ते ४ वेळेत तर भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह ज्येष्ठ शुद्ध भागवत एकादशी शनिवार दिनांक ७ जून २०२५ व सांगता ज्येष्ठ ३ शनिवार १४ जून २०२५ रोजी होत आहे याचबरोबर अभंग वाणी, संगीत भजन यामध्ये महाराष्ट्र राज्यातील नामवंत गायक व वादक हजेरी लावीत आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी, शांती ब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ.प. महादेव महाराज (तात्या) श्रीक्षेत्र चाकरवाडी हे आहेत.

# अंबरनाथमध्ये स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात काँग्रेसचा तीव्र विरोध

## निषेध आंदोलनात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०६, अंबरनाथ (ठाणे) :** अंबरनाथ शहरात केंद्र सरकार पुरस्कृत RDSs योजने अंतर्गत नागरिकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट प्रीपेड मीटर (TOD मीटर) बसवण्याच्या विरोधात आज शहर काँग्रेस कमिटीने जोरदार आंदोलन केले. ग्राहकांचे आर्थिक नुकसान होईल. नागरिकांना विश्वासात न घेता निर्णय घेतले जात आहेत.

या मुद्द्यांवर शहर काँग्रेस आक्रमक झाली आहे. हे आंदोलन अंबरनाथ शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. कृष्णा रसाळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार, दिनांक ०६ जून २०२५ रोजी पार पडले. सकाळी १०.३० वाजता अंबरनाथ पश्चिम येथील महावितरण कार्यालयाबाहेर निषेध मोर्चा काढण्यात आला. आंदोलनात केंद्र सरकार व अडाणी समूहाच्या




धोरणांचा जोरदार निषेध करण्यात आला.

शहर काँग्रेसकडून महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन देत स्पष्टपणे सांगण्यात आले की, अंबरनाथ शहरात नागरिकांच्या संमतीशिवाय स्मार्ट प्रीपेड मीटर बसवले जाणार नाहीत. या विषयावर निर्णय घेताना लोकशाही प्रक्रिया पाळावी आणि लोकांच्या मताचा आदर करावा, अशी मागणी करण्यात आली.


अनिता प्रजापती प्रदेश सचिव, महिला काँग्रेस, विलास जोशी माजी नगरसेवक, रोहितकुमार प्रजापती संघटन सरचिटणीस, शहर काँग्रेस, नंदू देवडे, सायरा सय्यद, गोपाल राय, राजेंद्र मिश्रा, शंकर गायकवाड, अजिंक्य सावंत, अब्दुल गणी पिरजादे, पुष्पा पनीकर, राईस शेख, अण्णा भालेराव, शोभा बांगर, दीपक भोईर, बानो सय्यद, दिलारा खान, सलीम खान, जगदीश तेलंगे आणि इतर असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. निवेदन देताना काँग्रेसने ठामपणे म्हटले की, TOD मीटर हटाओअंबरनाथ बचाओ हीच लढ्याची दिशा आहे. जनतेच्या हितासाठी हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

# अहिल्यानगरमधील २७ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** खरीप हंगाम २०२५ अनुषंगाने कृषी विभागाने जिल्हाभरात कृषी सेवा केंद्रांची व्यापक तपासणी मोहिम राबवली असून या मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळून आल्या आहेत. नियमबाह्य कामकाज करणार्या केंद्रांवर कारवाई करत राहुरी तालुक्यातील २ आणि नेवासा तालुक्यातील १ असे ३ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

कृषी विभागाच्या तपासणीत विविध त्रुटी उघड झाल्या असून त्यामध्ये भाव फलक व साठा फलक नसणे, विक्री परवाना दुकानदाराने दर्शनी भागात न लावणे, साठा पुस्तके अद्ययावत नसणे,





स्रोत परवान्यात नमूद नसणे, ग्राहकांना पावत्या न देणे, विक्री अहवाल दर म हिन्याला सादर न करणे, टोल फ्री क्रम ांक उपलब्ध नसणे आणि खतांची विक्री पॉस मशिनवरून न करणे अशा गंभीर त्रुटींचा समावेश आहे. तपासणीनंतर दोषी ठरलेल्या केंद्रांना नोटीस देऊन सुनावणीही घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान दोष सिद्ध झाल्यानंतर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. विक्री परवाने घेतले असतानाही दुकाने बंद ठेवणार्या केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. या अंतर्गत राहुरी तालुक्यात ४, अकोले ६, नेवासा ५, शेवगाव ३, नगर ३ आणि पाथर्डी ३ अशा २४ विक्री केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, खरीप हंगामात शेतकर्यांना योग्य वेळी आणि नियमानुसार सेवा मिळाव्यात, यासाठी ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. यापुढील काळातही अशाच प्रकारची नियमित तपासणी सुरू राहणार असून, नियमभंग करणार्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी स्पष्ट केले आहे.

# हिमायतनगर आठवडी बाजार ने घेतलेला मोकळा श्वास...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, हिमायतनगर :** हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी मोठी वर्दळ पाहायला मिळते. आठवडी बाजारच्या दिवशी शहरात ठीक ठिकाण वरून असंख्य नागरिक शहरात दर बुधवारी भरविला जाणाऱ्या आठवडी बाजार करण्यासाठी शहरात नागरिक येतात. त्यामुळे शहरात मोठी गर्दी निर्माण होते. दि.२८ मे च्या आठवडी बाजारच्या दिवशी हिमायतनगर शहरातील मुख्य रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे शहरातील ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णवाहिकेस रस्ता मिळत नसल्याची वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. या वृत्ताची दखल हिमायतनगर येथील नगरपंचायत प्रशासनाने घेऊन तात्काळ दि.४ जून रोजी भरविण्यात आलेल्या आठवडे बाजाराचा मुख्य रस्ता रुग्णवाहिकेसाठी मोकळा करून नागरिकांची गैरसोय दूर केली. पण हिम ायतनगर शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात अजून सुद्धा मोठमोठी दुकाने थाटल्याने तिथे येणाऱ्या नागरिकांना त्या अतिक्रमणाचा नाहक त्रास होत आहे, याची सुद्धा प्रशासनाने दखल घ्यावी असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, हिमायतनगर शहराला अतिक्रमणाच्या विळख्याने घेराव घातल्याचे चित्र सध्या पाहायला मिळते. ठिकठिकाणी वाढलेल्या अतिक्रमणामुळे शहरात इजा करणाऱ्या नागरिकांना व वाटसरूंना याचा नाद त्रास होत आहे. दिनांक २८ मे च्या दिवशी भरवल्या जाणाऱ्या आठवडी बाजारात ठीक ठिकाणी मुख्य रस्त्यावर भाजीपाला गाडे लावल्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावर वाहतूक ठप्प झाली होती. त्या वाहतुकीमधून ग्रामीण रुग्णालय येथे येणाऱ्या १०८ च्या रुग्णवाहिकेस वाट शोधावी लागत असल्याची बातमी अनेक वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आली होती.


या सर्व बाबीची हिमायतनगर येथील नगरपंचायत प्रशासन व हिमायतनगरच्या तहसीलदार पल्लवी टेमकर यांनी दखल घेऊन तात्काळ दिनांक ४ जूनच्या आठवडी बाजारात उभारण्यात येणारे सर्व दुकानास नोटीस देऊन रस्त्यावर कोणीही अतिक्रमण करणार नाही अतिक्रमण केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल अशा सूचना देऊन शहरातील आठवडी बाजारचा मुख्य रस्ता रुग्णवाहिकेस मोकळा करून दिला त्यामुळे आठवडी बाजारच्या रस्त्याने अखेर मोकळा श्वास घेतल्याने शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. पण ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात असलेल्या भिंती लगतचे अतिक्रमण अजूनही तसेच आहे. या बाबत सुद्धा नगरपंचायत प्रशासनाने काही तरी ठोस पाऊले उचलून तेथील अतिक्रमण काढून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना, व रुग्णांना होणारा त्रास दूर करावा अशी मागणी सुद्धा शहरातील सुजाण नागरिकांतून होत आहे.

# तेरणा कालव्याच्या जवळून जाणाऱ्या तेर-ढोकी रस्त्यावरील प्रवास रामभरोसे

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०६, धाराशिव :** तेर-ढोकी-कळंब राज्य म ार्गावरील तेर जवळ असणाऱ्या तेरणा मध्यम प्रकल्पाच्या कालव्याच्या जवळून जाणाऱ्या रस्त्यावरील प्रवास हा रामभरोसे ठरणारा आहे. तेरणा मध्यम प्रकल्पाच्या कालव्याची दुरुस्ती करण्यात येऊन पुर्वीच्या मातीच्या कालव्याचे रूपांतर सिमेंट कालव्यात करण्यात आले.

त्यामुळे कालवा पुर्वर्वीपेक्षा खोल झाला आहे. या कालव्याला खेटूनच तेर-ढोकी-कळंब-वरूडा-धाराशिव हा राज्यमार्ग क्रमांक २०८ जातो. परंतू, या राज्य म ार्गाला खेटूनच अंदाजे २ किलोमिटर लांबीचा कालवा आहे. तो धोकादायक ठरणारा आहे. या रस्त्यालगत कुठल्याही प्रकारचा अडथळा नाही. रस्त्याच्या बाजूला



संरक्षक कठडे उभारण्याची गरज आहे. बांधकाम विभागाने साधे रिफ्लेक्टर ही बसवले नाहीत. मार्च म हिन्याच्या अखेरीस घाईगडबडीने रस्त्यावर सिमेंटच्या पोत्यात माती भरून ठराविक अंतरावर ठेवण्यात आली होते. परंतू ते ही आता रात्री अपरात्री येणाऱ्या वाहन धारकांना कालव्याच्या खोलीचा अंदाज येत नाही. त्याम ुळे वाहन सरळ कालव्यात पडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा रस्ता बांधकाम विभागाच्या कळंब उपविभागातंर्गत येत आहे.

बांधकाम विभागांच्या वतीने या रस्त्यावर. कालव्याच्या शेजारी साईड पट्टी टाकली नाही . अपघाताचा धोकादायक ठिकाण दर्शविणारा फलकही लावण्यात आलेले नाहीत. रस्त्यावर रिफ्लेक्टरही बसविण्यात आले नाही. वेग मर्यादा फलक नाहीत. त्यामुळे या रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा रस्त्यावरील प्रवास रामभरोसे ठरणार आहे. दुर्घटना होण्यापूर्वी ती टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग यांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

# जिल्हा परिषद ठाणे येथे शिवराज्याभिषेक सोहळा जल्लोषात साजरा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, ठाणे :** छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन म्हणजेच शिवस्वराज्य दिन जिल्हा परिषद, ठाणे येथे आज अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. ०६ जून १६७४ या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. स्वराज्य, सार्वभौमत्व आणि स्वाभिमानाचे प्रतीक ठरलेल्या या ऐतिहासिक घटनेचा स्मृतिदिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर शासन निर्देशानुसार शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येतो.

जिल्हा परिषद ठाणेच्या आवारात आयोजित या कार्यक्रम ाची सुरुवात प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, राजमाता व महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर मानाची स्वराज्यगुढी उभारून वंदन करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रगीत व राज्यगीत गायन करत 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!' च्या घोषणांनी परिसरात उत्साही वातावरण निर्माण केले.

या वेळी मार्गदर्शन करताना प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांकडून मिळणारी प्रेरणा ही आपल्या प्रामाणिक आणि चिकाटीच्या कार्यपद्धतीची मूळ प्रेरणा आहे. प्रत्येक अडचणीवर मात करत कार्य करत राहणे हेच खरे शिवस्वराज्य साध्य करण्याचे माध्यम आहे. त्यांनी उपस्थित सर्वांना शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) संदीप चव्हाण, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग प्रमुख प्रकाश सासे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (म ाध्यमिक) देविदास महाजन, बालविकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, पशुसंवर्धन विभाग प्रमुख (प्रभारी) डॉ. किर्ती डोईजोडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी रविंद्र तरे व त्यांच्या समूहाने देशभक्तिपर गीत व पोवाडा सादर केला. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन अनिल सूर्यवंशी यांनी प्रभावीपणे केले.

# थोडक्यात

## प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

**अक्षराज: दिवाकर घेर**



**दि.०५, नागपूर :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय खापरखेडा येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पर्यावरणाचे महत्त्व सांगताना कामठी सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी प्रेमलता दीदी म्हणाल्या की, आपण निसर्गाची काळजी करत नाही, म्हणूनच निसर्गानेही आपली काळजी करणे सोडून दिले आहे. आपण विचार न करता संसाधनांचा वापर केला आहे, त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. ज्यामुळे पूर, त्सुनामी सारख्या आपत्ती येत आहेत. आपण मानवांनी पावसामुळे पर्यावरणाचे खूप नुकसान केले आहे, म्हणून आपण सर्वांनी जागे होऊन पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी एकत्रित पावले उचलणे आवश्यक आहे. जर आपण अजूनही निसर्ग आणि पर्यावरण रक्षणाबद्दल गंभीर झालो नाही तर पुढील काहीशे वर्षांत संपूर्ण प्राणी जगाला या पृथ्वीवरून नामशेष होऊन मानवी चुकांचे परिणाम भोगावे लागू शकतात. म्हणून आपण वेळीच आपल्या जीवनात अध्यात्म स्वीकारले पाहिजे आणि मानसिक प्रदूषण संपवण्याच्या संकल्पाने शक्य तितकी झाडे लावली पाहिजेत. कार्यक्रमाचे संचालन ब्रह्माकुमारी संगीता दीदी यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत ब्रह्माकुमारी प्रेरणा दीदी आणि सपना दीदी यांनी केले. कार्यक्रमात माजी जि.प. सदस्य अशोक तांदुळकर, माजी पंचायत समिती उपसभापती राहुल तिवारी, विश्वजित सिंह, माजी जि.प.सदस्य छाया ढोले, डॉ.ओंकार केळवदे, कपिल वानखेडे, नरेंद्र मोटघरे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व ब्रह्मकुमारी बंधू-भगिनींनी सहकार्य केले.

## वृक्षलागवड बरोबरच वृक्षसंवर्धन महत्त्वाचे - रावसाहेब सुर्वे

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.०५, खंडाळा (सातारा) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने निप्रो फार्मापॅकजिंग इंडीया प्रा.लि. यांचे वतीने भोळी, शेखमिरवाडी, माने कॉलनी येथील शेतकऱ्यांना फळ झाडांची मोफत रोपे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना कंपनीच्या एच.आर.विभागाचे व्यवस्थापक रावसाहेब सुर्वे म्हणाले, पुर्वी प्रवासा दरम्यान विश्रांतीसाठी हॉटेल किंवा इतर व्यवस्था नसायची त्यामुळे प्रवासी रस्त्यालगतच्या झाडाच्या सावलीत विश्रांती घेत असत. अलीकडील काळात ही झाडे कुठे दिसून येत नाहीत. प्रत्येकाने वृक्षलागवड करावीच परंतु त्याचे संवर्धन करणे त्यापेक्षा महत्त्वाचे आहे असेही ते म्हणाले. यावेळी क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी आधिष्ठाता प्रा.डॉ. विकास वासकर यांनी ही वृक्ष लागवडीचे महत्व सांगितले तसेच पावसाळ्यात जनावरांचे होणारे आजार व घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमात स्वागत व प्रास्ताविक खंडाळा तालुका विकास प्रतिष्ठानचे सचिव डॉ.विजय शिंदे यांनी केले. यावेळी न्यु इंग्लिश स्कूल भोळी येथे मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास कंपनीचे वतीने धनाजी जाधव, प्रशांत धापते तेजस्विनी बावधने आदी उपस्थित होते. तर प्रा.डॉ. अंबोरे, डॉ.शेलार, जयवंत चव्हाण, विश्वास चव्हाण, भरत चव्हाण, कृषी सहायक संतोष क्षीरसागर, सम्राट जाधव, सिंजेटाचे शिंदे व शेतकरी हे ही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी देवानंद चव्हाण व सागर चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रस्ते दुरूस्ती करा अन्यथा आंदोलन - शिवसेना (उबाठा) चा इशारा

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** शहापूर भांरगी नदीवरील पूल ते आसनगाव स्टेशनकडे जाणारा मूबंई नासिक हायवेब्रिज पर्यत रस्त्याच्या दूतर्फा असलेली माती काढून लेव्हलिंग करणे तसेच स्पिडब्रेकर टाकणे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या शहर शाखेतर्फे श्री.कांबळे, उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कार्यलयात नुकतीच महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी शहापूर ते आसनगाव ब्रिज पर्यत काँक्रीटरस्ता बनविला असून ब्रिजजवळील रस्ता व ब्रिजमधील आंतररात काँक्रीटिकरण न केल्याने मध्ये खड्डे तयार झाले आहेत. हायवेच्या ब्रिजखाली सुद्धा तशीच परिस्थिती असून सदर खड्डे काँक्रीटने भरण्यात यावे. बनविलेल्या रस्त्याच्या दूतर्फा लेव्लिंहग न केल्याने कूठे रस्त्यावर मातीचे ढीग जमा झालले आहेत. तर कूठे खड्डे तयार झाले असून तिथे लवकरात लवकर लेव्हलिंग करावे, दूतर्फा चालण्यासाठी फूटपाथ तयार करावे. शहापूर पंडीतनाका ते किन्हवली हा रोड हायवेचा ब्रिज पर्यत मागील वर्षी बनविला असून अद्याप पर्यंतरोडच्या मध्ये काम अपुरे असून मध्येच सोडलेल्या जागेत खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे सतत स्कूटी व मोटारसायकल स्लीप होण्याचे प्रकार होतात, ते खड्डे ताबडतोब खड्डे भरण्यात यावे किंवा डिव्हायडर लावण्यात यावे. अशा अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच निवेदनाची तात्काळ दखल न घेतल्यास शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने ऊग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.यावेळी शहर प्रमुख विजय देशमुख, जिल्हा सहसचिव डॉ.अजित पोतदार, सुरेश पाटील, युवा अधिकारी आतिश अधिकारी आदी उपस्थित होते.

## ढवळपूरी परिसरात टोमॅटो बांधणीला वेग

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढवळपूरी, गावडेवाडी, वारथजांभळी,लम्हाण तांडा, रानमळा परिसरात उन्हाळी हंगामात लागवड केलेल्या टोमॅटोची बांधणी करण्यात येथिल शेतकरी वर्ग व्यक्त असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. मजूर टंचाईमुळे इर्जिक पद्धतीने ही कामे करण्याला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले जात असल्याचे काही शेतकऱ्यांनी सांगितले. उन्हाळी हंगामात १ मे तसेच पावसाळी हंगामात १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान बरेच शेतकरी टोमॅटोची लागवड करतात. या दरम्यान लागवड झालेल्या टोमॅटोला हमखास बाजारभाव मिळत असतो,असा बऱ्याच वर्षांचा अनुभव या परिसरातील इथल्या प्रत्येक शेतकऱ्यांना आहे. कारण यादरम्यान वळवाचा पाऊस होत असतो. त्यामुळे या लागवडी पावसात सापडतात. त्यामुळे मंचर,खेड, नाशिक, सिन्नर, ह्या भागातील टोमॅटोचे आगाराचे भरपूर नुकसान होते व त्या तुलनेत पारनेर तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी राहते. येथिल शेतकरी टोमॅटोला खतांची योग्य मात्रा, वेळेवर योग्य औषध फवारणी करत आपल्या बागा शेतकरी वाचवतात व हमखास बाजारभाव मिळतो.

सध्या ढवळपूरी परिसरात टोमॅटोच्या पिकांच्या बांधणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू आहे. मात्र, मजुरांची टंचाई भासत आहे. टोमॅटो बांधणीसाठी जास्त रोजंदारी द्यावी लागत असल्याने यावर स्थानिक शेतकऱ्यांनी इर्जिक पद्धतीने टोमॅटोची बांधणीचा पर्याय निवडला असल्याचे टोमॅटो उत्पादक शेतकरी गणेश रंगनाथ चौधरी यांनी सांगितले. टोमॅटोवर फळम ाशीचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले.